**रयत शिक्षण संस्थेचे ,**

**कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, मोखाडा ता. मोखाडा जि.पालघर**

---

# "श्रावणी कवी संमेलन अहवाल"

महाविद्यालयाचा मराठी विभाग हा नेहमी वैविध्यपूर्ण उपक्रम राबवीत असतो. मराठी वाङ्मय मंडळ आयोजित श्रावणी कवी संमेलन आयोजित करण्यात आले होते. मुळात हे कवी संमेलन श्रावण महिन्यात आयोजित केले जाते. परंतु या वर्षी कॉविड-१९ च्या प्रादुर्भावामुळे दिनांक १३ जानेवारी २०२१ रोजी या ऑनलाईन श्रावणी कवी संमेलनाचे आयोजन केले होते. या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे/कवी डॉ. बी. एम. मगदूम (श्री. रावसाहेब रामराव पाटील महाविद्यालय, सावळज ता. तासगाव जि. सांगली ) व प्रा. डॉ. ए. व्ही. भावे ( आबासाहेब मराठे आर्ट्स आणि न्यू वाणिज्य, सायन्स कॉलेज राजापूर (विखारे गोठणी) जि.रत्नागिरी कवी म्हणून आमंत्रित केले होते. कवी संमेलनात सहभागी विद्यार्थी व श्रोतुगण - ३१ एवढे होते.

या कार्यक्रमच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा. एस. ई. सैंदनशिव हे होते. या कार्यक्रमाचे आभार प्रा. एम. आर. खंबाईत यांनी केले.

**उद्देश :** १) महाविद्यालयातील विद्यार्थ्यांतील काव्यलेखन विषयक कला गुण विकसित होणे.

२) काव्यलेखन करणाऱ्या विद्यार्थ्यांना व्यासपीठ उपलब्ध करून देणे.

३) कविता सादरीकरणाचे कौशल्य आत्मसात व्हावे.

**निष्कर्ष :** १) महाविद्यालायतील विद्यार्थ्यांतील काव्यलेखन विषयक कला गुण विकसित करण्यास मदत झाली.

२) काव्यलेखन करणाऱ्या विद्यार्थ्यांना व्यासपीठ उपलब्ध करून देता. आले.

३) काव्यलेखन करणाऱ्या कवींच्या कवितांचा परिचय विद्यार्थ्यांना झाला. या कवी संमेलनात मनोज वारघडे (टी. वाय. बी. ए.), कुणाल गोडे.(एफ. वाय. बी. ए.), रवींद्र वारे (एस. वाय. बी. ए.), व चंद्रकांत कोरडा (एफ. वाय. बी. ए.) इत्यादी विद्यार्थ्यांनी काव्यवाचन केले.

४) काव्य सादरीकरणाची कला विद्यार्थ्यांना आत्मसात करण्यास सुलभता आली.

मराठी विभागप्रमुख
Head , विभागप्रमुख
Department of Marathi / मराठी विभाग

for प्राचार्य
प्राचार्य
कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय
मोखाडा, जि. पालघर